महाराष्ट्र शासन

# विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(लेखा शाखा)

ई-मेल:- **dcg.aurangabad@gmail.com** **दूरध्वनी क्र** 0240-2351311

---

## जाहीर नोटिस

जा.क्र २०२५/साप्र/लेखा-४/झे.दे.दु./कावी

दिनांक :२/०९/२०२५.

**विषय : विभागीय आयुक्त कार्यालयातील झेरॉक्स मशीन देखभाल/दुरुस्ती (सर्व साहित्यासह) दरपत्रक मागविणेबाबतच्या .**

विभागीय आयुक्त कार्यालयातील खालीलप्रमाणे नमूद केलेल्या झेरॉक्स मशीनच्या देखभाल/दुरुस्तीसाठी (सर्व साहित्यासह) सेवा पुरवठादार यांच्याकडून सोबत जोडलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून दिनांक -१/१०/२०२५ ते ३०/०९/२०२६ या कालावधीकरीता किंवा पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष या कालावधीसाठी देखभाल व दुरुस्तीसाठी खालील विवरणपत्रात दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ,क्र | मेक व मॉडेल क्रमांक | मशीन अनुक्रमांक | शाखा | दर प्रति प्रत/प्रिंट |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | Ricoh Afficio MP 2000L 2 | L 7136350211 | अपील | |
| २. | Ricoh Afficio MP 2014.AD | G619M440486 | अभिलेख | |
| ३. | Ricoh 1813 L | E-344MB40111 | सामान्य प्रशासन | |
| ४. | Ricoh Afficio IM-5000 | 4452R960014 | महसूल शाखा | |

**दरपत्रके भरण्यासाठीच्या सुचना –**

१. दर नमूद करतांना सर्व करांचा समावेश नमूद करावेत.

२. उपरोक्त विवरणपत्रात दरपत्रक हे संस्थेचे /आस्थापनाचे लेटरहेडवर सादर करणे.

**दरपत्रके दरपत्रकासोबत खालील कागदपत्रे जोडावीत–**

1. दुकाने व संस्था अधिनियम 1947 अन्वये संस्थेचे /दुकानाचे अदयावत नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत
2. आधारकार्डची छायांकित प्रत .
3. पॅनकार्डची छायांकित प्रत.
4. GST नोंदणी प्रमाणपत्राची (Certificate of Registration )
5. असल्यास मागील एक वर्षाचे आयकर विवरणपत्राची प्रत व शेवटचे तिमाहीचे विवरणपत्र (GST Return) छायांकित प्रत
6. असल्यास मागील एक ते तीन वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र.
7. एकच दरपत्रक सादर करणे/ काळ्या यादीत नसल्याबाबत/कामात दिरंगाई करणार नाही व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत "प्रतिज्ञापत्र / हमीपत्र"

आपल्याकडील दरपत्रके वरील कागदपत्रासह या कार्यालयास दिनांक -२/०९/२०२५ ते १२/०९/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वा पर्यंत या कार्यालयाचे लेखाशाखेमध्ये सादर करावेत. उशिरा प्राप्त झालेल्या किंवा अपूर्ण दरपत्रके यांचा विचार करण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी विहीत दिनांकास व विहीत वेळेपर्यंत प्राप्त झालेली दरपत्रके शक्य झाल्यास दिनांक १५/०९/२०२५ रोजी दुपारी ३.०० वा किंवा कार्यालयीन कामकाजाच्या दुस-या दिवसी अपर आयुक्त (साप्र) विभागीय आयुक्त कार्यालय छ.संभाजीनगर यांचे कक्षामध्ये सर्व उपस्थितांसमक्ष (उपस्थित असल्यास ) उघडण्यात येतील.

**मा.विभागीय आयुक्त यांच्या टिपणी मान्यतेने...**

**(के.के.पवार)**
**तहसीलदार (सा.प्र)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, छ.संभाजीनगर.**

महाराष्ट्र शासन
**विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
(लेखा शाखा)
ई-मेल:- **dcg.aurangabad@gmail.com** **दूरध्वनी क्र** ०२४०-२३५१३११

---

खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार हमीपत्र आस्थापनेच्या /संस्थेच्या लेटरहेडवर देण्यात यावे.

## प्रतिज्ञापत्र /हमीपत्र

विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयासातील झेरॉक्स मशीन देखभाल दुरुस्ती (सर्व साहित्यासह) हि सेवा पुरविण्यासाठी दरपत्रक मी/आम्ही दाखल करीत असून खालील प्रमाणे हमी देत आहे .

मी एकापेक्षा अधिक संस्थेचा मालक/संचालक/भागीदार/बहुसंख्य भागधारक नाही, असल्यास मी ज्या संस्थेचा मालक/संचालक/भागीदार/बहुसंख्य भागधारक आहे त्यासंस्थेपैकी एकाच संस्थेमार्फत मी एकच दरपत्रक सादर करीत आहे.

तसेच माझ्या कंपनीस/संस्थेस राज्य तसेच केंद्र शासकीय/निमशासकीय/ स्थानिक संस्था यांनी काळ्या यादीत टाकलेले नाही असे मी प्रमाणित करीत आहे.

मला पूर्ण कल्पना आहे की, मी माझ्या कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ साधन सामग्री उपलब्ध ठेवेल. माझ्या कामात कोणत्याही प्रकारची कसूर /दिरंगाई अथवा हजलगर्जीपणा झाल्यास विभागीय आयुक्त कार्यालय निश्चित करतील अशा दंडास अथवा कायदेशिर शिक्षेस मी पात्र राहीन. मी निविदा / दरपत्रकातील अटी व शर्ती पुर्णपणे वाचलेल्या आहेत. सदर अटी व शर्ती मला मान्य असून त्यांच्या अधिन राहून मी सदर दरपत्रक सादर करीत आहे.

वरील सर्व माहिती खरी व सत्य असून यामध्ये काही असत्यता आढळून आल्यास माझी कंपनी/संस्था दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहीन हे मला मान्य आहे.

स्थळ :

दरपत्रकधारकाचे नाव व सही, शिक्का

दिनांक :

नाव : ------------------------------
पत्ता : ------------------------------
------------------------------.
भ्रमणध्वनी क्र. ---------------------

महाराष्ट्र शासन

# विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(लेखा शाखा)

ई-मेल:- **dcg.aurangabad@gmail.com** **दूरध्वनी क्र** 0240-2351311

---

**दरपत्रक अंतिम झाल्यानंतर सेवापुरवठादार यांनी करारनामा करुन दयावयाच्या अटी व शर्ती**

1. विभागीय आयुक्त कार्यालयातील Ricoh Afficio झेरॉक्स मशीनच्या देखभाल / दुरुस्तीसाठी दिनांक-१/१०/२०२५ ते ३०/०९/२०२६ या कालावधीकरीता किंवा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष अंमलात राहतील शक्य झाल्यास सदर करारास शासन नियमानुसार मुदतवाढ देणे आवश्यक असल्यात मुदतवाढ देणेत येईल. तथापि मुदतवाढ कालावधीमध्ये स्वीकृत दरानेच भाडे आकारणी करण्यात येईल सदरची मुदतवाढ स्वीकारणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
2. झेरॉक्स मशिनच्या दुरुस्ती व देखभाल (टोनर, ड्रम, व संपूर्ण स्पेअर पार्टससह विनामुल्य पुरवठा करून) दुरुस्ती करणे आवश्यक राहील.
3. विभागीय आयुक्त कार्यालय हे विभागीय स्तरावरील असल्यामुळे मंत्रालयीन व्हिडीओ कॉन्फरन्स, राजस्व अधिकारी यांच्या बैठका इ. मुळे या कार्यालयाचा मंत्रालयाशी थेट संपर्क येत असल्याने या कार्यालयातील झेरॉक्स मशीनची आवश्यक त्या सुट्या भागांसह देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने एक तंत्रज्ञ या कार्यालयात नेहमी उपस्थित राहणे आवश्यक राहील.
4. जर झेरॉक्स मशिनच्या दुरुस्ती/देखभालची कामे वेळेत केली जात नसेल, कामात चालढकल करत असेल, अथवा समाधानकारक काम करत नसेल तर हे कार्यालय कोणतीही पूर्वसूचना न देता करार रद्द करण्यात येऊन सुरक्षा अनामत रक्कम व प्रलंबित देय देयकाची रक्कम सर्व रक्कम जप्त करण्यात येईल, व याबाबत काहीही उजर राहणार नाही.
5. कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम 1970, महाराष्ट्र कंत्राटी नियम 1971, व इतर सर्व कामगार/औद्योगिक कायद्याचे पालन करण्याची व त्यानुसार आवश्यक ते अभिलेखे विहित नमुन्यात ठेवण्याची व विवरणपत्रे इत्यादीबाबत वेळेचे वेळी पूर्तता करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
6. झेरॉक्स मशिनच्या दुरुस्ती/देखभाली करीता नियुक्त केलेल्या कामगारांची नाव, कायमचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक व फोटो सहित यादी या कार्यालयास सादर करावी लागेल तसेच कामगारांवर सेवापुरवठादाराचे नियंत्रण असणे आवश्यक राहील.
7. कार्यालयातील किंवा कार्यालयीन परिसरातील कोणत्याही सामानाची चोरी, लपवालपवी होणार नाही हे पाहणे ठेकेदाराची जबाबदारी राहील व असे काही झाल्यास याची सर्व जबाबदारी सेवापुरवठादाराची राहील.

8 निविदाधारकाने नियुक्त केलेल्या कामगार/कर्मचारी यांचेकडून गैरवर्तन अथवा कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास निविदाधारकाकडून नुकसान भरपाई घेण्यात येईल.

9 झेरॉक्स मशीन दुरुस्ती साठी आवश्यक असलेले साहित्य नवीन उत्पादनामधील गुणवत्तापूर्ण व चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक राहील, जेणे करून झेरॉक्स मशीन उत्कृष्टपणे कार्यान्वित राहतील. ( देयकाबाबत कार्यालयाच्या विरोधात उपोषण / आत्मदहन करण्याचा अधिकार रहणार नाही. उपोषण / आत्मदहन केल्यास संबंधित कार्यालय / शासन जबाबदार राहणार नाही यांची दरपत्रकधारकाने नोंद घ्यावी.

10 झेरॉक्स मशीन असलेल्या सर्व शाखांच्या अनुपालन अहवालासह व पूर्तता अभिप्रायासह प्रतीमहा देयक अभिलेखपालामार्फत लेखा शाखेत प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपूर्वी सादर

---

करावे लागेल. कार्यालयीन आर्थिक तरतुद उपलब्ध राहील त्याप्रमाणे देयके मंजूर करून प्रदान करण्यात येईल. त्याकरीता कोणतेही अग्रिम दिले जाणार नाही.

11 दरपत्रक मंजूर झाल्यानंतर सेवापुरवठादारास दरपत्रकाच्या रक्कमेच्या 3 टक्के इतक्या रकमेचा सेवा घेणा-या प्रधिका-याच्या नावाने शहरात देय असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेचा एफ डी.आर अनामत रक्कम ठेवावी लागेल. कराराची मुळ मुदत/वाढलेली मुदत संपल्यानंतर हि रक्कम ठेकेदाराला त्यांच्याकडून कार्यालयाचे नुकसान झाल्यास तेवढी रक्कम वजा करून परत करण्यात येईल.

12 उपरोक्त अटी व शर्तीप्रमाने कार्यवाही न केल्यास करारनामा रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील. कोणतीही नोटीस न देता करारनामा रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही उजर चालणार नाही.

13 वरील सर्व अटी व शर्ती मध्ये नवीन अटी व शर्तीचा समावेश करणे, अटी व शर्ती कमी करणे तसेच परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांनी राखून ठेवले आहे.

14 न्यायालयीन कामकाजासाठी कार्यक्षेत्र हे छत्रपती संभाजीनगर राहील.